पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१/ ७२/ ७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००
संकेतस्थळः http://su.digitaluniversity.ac.in, ई-मेलः affiliation@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

[ शैक्षणिक, संशोधन आणि विकास (संलग्नता विभाग) विस्तारीत क्रमांक : १२२ ]

जावक क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/२०२०/5710 दिनांक : - 7 AUG 2021

अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित

प्रति
१) मा. प्राचार्य/प्राचार्या सर्व संलग्नित महाविद्यालये
२) मा. संचालक, विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (८) मधील असामान्य परिस्थितीत विशिष्ठ विद्याशाखांच्या अतिरिक्त **तुकडयांना** जलद गतीने मान्यता देणेबाबत..

संदर्भ : मा. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्र.४१८ महाराष्ट्र शासन मुंबई यांचे जा.क्र.बैठक-२०२१/प्र.क्र.१६१/विशि-३ दि.०५/०८/२०२१ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, १२ वी नंतरच्या विविध (Non Professional) अभ्यासक्रमाच्या प्रवेशा संदर्भात मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४ ऑगस्ट, २०२१ रोजी दु. ३:०० वा. दुरदृश्य प्रणालीव्दारे (Video Conferencing) व्दारे बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (८) मध्ये असामान्य परिस्थितीत विशिष्ठ विद्याशाखांच्या अतिरिक्त तुकडयांना जलद गतीने मान्यता देण्याबाबतच्या तरतूदीनुसार व शासन निर्णय दि.०४/०७/२०१७ मधील निर्देशानुसार, सर्व अकृषी विद्यापीठांनी जलदगतीने तुकडी मान्यतेबाबत विहित कालावधीमध्ये विद्यापीठ स्तरावरून आवश्यक कार्यवाही करणेबाबत विद्यापीठास संदर्भीय पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील/संकुलातील प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तुकडी संख्येमध्ये वाढ करावयाची आवश्यकता असेल तर विहित नमून्यात प्रस्ताव तयार करून सॉफ्ट कॉपी affiliation@sus.ac.in या ई-मेलवर अथवा हार्ड कॉपी मध्ये प्रस्ताव दि. १०/०८/२०२१ पर्यंत विद्यापीठास सादर करावा.

तसेच, प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रीया दि. ३०.०८.२०२१ पर्यंत करून विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाकडे सादर करावे.

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
प्र.कुलसचिव